(285)

क्र. प्राधिकरण/एम्टीजी/१५.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
कार्यालय, १८ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई नं. ४०० ०३२.

401

दिनांक : ७ एप्रिल, १९७८.

प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, १९७८ रोजी झालेल्या पंधराव्या सभेच्या कार्यवृत्ताची मराठी प्रत सोबत जोडली आहे.

सचिव,
कार्यकारी समिती.
7.4.78

प्रति,

सर्व सदस्य व निमंत्रित
प्राधिकरणाचे सर्व अधिकारी.

Issued on 7 APR 1978

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, १९७८ रोजी भरलेल्या पंधराव्या बैठकीचे कार्यवृत्त

स्थळ : मुंबई महानगरपालिकेचे सभागृह

बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची व निमंत्रितांची यादी सोबत जोडली आहे.

२. बैठकीच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्री ( व नगरविकास मंत्री ) होते. महापौरांनी मुख्यमंत्री (व नगरविकास मंत्री) यांचे स्वागत केले. नंतर अध्यक्षांनी प्राधिकरणातर्फे माजी अध्यक्ष श्री. रत्नाप्पा कुंभार, उपाध्यक्ष डॉ. (श्रीमती) सुशीला बलराज, व सर्वश्री व्ही.आर्.होशिंग, एच्.जी.वर्तक, एस्.के.वानखेडे, व्ही.के.टेंबे, एस्.एस्.दिघे, नकुल पाटील आणि श्रीमती कमला रामन या सभासदांनी केलेल्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

३. त्यानंतर कार्यक्रम पत्रिकेवरील इतर कामकाजास सुरवात करण्यात आली.

विषय क्र. १ : तेराव्या व चौदाव्या बैठकींच्या वृत्तांतास पुष्टी देणे.

कार्यवृत्तांस पुष्टी देण्यात आली.

विषय क्र. २ : प्राधिकरणाच्या तेरा व चौदाव्या बैठकीच्या कार्यवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही.

केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

श्री. बसवंत यांनी प्राधिकरणाच्या तेराव्या बैठकीच्या कार्यवृत्तांतामधील बाब क्र. ३ (नवीन मुंबईच्या प्रस्तावित विकास योजना) कडे लक्ष वेधले व पुढील बाबींच्या प्रगतीबाबत विचारणा केली.

(१) नवीन मुंबईतील सध्याच्या गावठणांच्या विकास व वाढीबाबतची तरतूद, आणि (२) विकास योजनेसाठी जमिनी ताब्यात घेतल्यामुळे प्रकल्प ग्रस्त झालेल्या स्थानिक लोकांचे पुनर्वसन. सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांनी असे स्पष्टीकरण केले की, गावठाणांच्या विकासासाठी नागरी कमाल जमीनी धारणा अधिनियमाखाली जागा ताब्यात घेण्यापेक्षा भू संपादन अधिनियमाखाली जमीनी ताब्यात घेणे अधिक योग्य होईल असा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे गांवठणांतील प्लॉटच्या वाटपाचा प्रस्ताव त्या त्या ग्रामपंचायतींशी विचारविनीमय करुन शासनास सादर करण्यात आला आहे. याबाबतची कार्यवाही शासनाची मान्यता मिळताच करण्यात येईल. याबाबतची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी असा अध्यक्षांनी आदेश दिला. जमीनी ताब्यात घेतल्यामुळे प्रकल्पग्रस्त झालेल्या लोकांच्या पुनर्वसनां संबंधात विकासाकरिता ज्या जमिनींची आवश्यकता नाही त्या जमिनीत पिके घेण्यास व जिथे शक्य आहे तेथे शेतीसाठी घरे (फार्म हाऊसीस) बांधण्यास परवाने देण्यासंबंधीची कार्यवाही त्वरीत करावी असा अध्यक्षांनी आदेश दिला.

विषय क्र. ३ : १९७८–७९ सालचा अर्थसंकल्प

प्राधिकरणाने कार्यक्रम पत्रिकेवरील टिप्पणी विचारांत घेतली. चर्चेच्या ओघात कांही सभासदांनी बृहन्मुंबईच्या बाहेरील विभागाच्या विकासासाठी अपुरी तरतूद आणि अन्य मार्गांनी व विशेषत: केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य मिळविण्याच्या दृष्टीने प्राधिकरण अयशस्वी झाले याबद्दल चिंता व्यक्त केली. महानगर आयुक्तांनी असे स्पष्ट केले की, हा अर्थसंकल्प म्हणजे प्राधिकरणाने दिनांक ८ डिसेंबर, १९७७ रोजी भरलेल्या बैठकीत संमत केलेल्या १९७८–७९ च्या कार्यक्रमाचेच आर्थिक रुपांतर आहे. एकात्म नागरी

विकास.....

विकास कार्यक्रमाखाली ( IUDP ) केन्द्र शासनाचे अर्थसहाय्य मिळविण्यासाठी स्थानिक अर्थसहाय्य समप्रमाणात उपलब्ध होणे आवश्यक असते. अशा आर्थिक सहाय्याच्या उणीवेमुळे बृहन्मुंबई आणि नवीन मुंबई बाहेरील महानगर प्रदेशाकरिता केन्द्र शासनाचे अर्थसहाय्य मिळविणे कठीण जाते. बृहन्मुंबई बाहेरील प्रदेशात सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) उपलब्ध करुन देण्याच्या कामांची निकडीची गरज आहे. परंतु त्याकरता प्राधिकरणाच्या आर्थिक घडणी मध्ये ज्या मर्यादा अंतर्भूत आहेत त्यांचेही त्यांनी स्पष्टीकरण केले. ह्या आर्थिक घडणीचे घटक असे आहेत :-

(१) फिरता निधी (रिव्हॉल्व्हींग फंड)
(२) कर्ज निधी (लोन्स फंड)
(३) उर्वरित किंवा व्यवहारिक निधी (ऑपरेशन्स फंड)

ज्या योजनेवरील खर्च केलेला पैसा वाजवी कालमर्यादेत परत मिळू शकेल अशाच योजनांवर फिरत्या निधीतून खर्च करता येतो. त्यामुळे सर्वेक्षण, अभ्यास, सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) योजना अशा बाबींवर फिरत्या निधीतून खर्च करता येत नाही. कारण हा खर्च वाजवी कालमर्यादेत भरुन निघणे शक्य नसते. जसजशी जमीन उपलब्ध होईल त्यानुसार क्षेत्रविकास व इतर संलग्न योजना ह्या निधीतून कार्यान्वित करण्यात येतात.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाच्या कलम १८(अ) अन्वये कर्जाऊ ~~कर्जाऊ~~ मिळणा-या रकमेतून, ज्यात एकात्म नागरी विकास योजनेनुसार ( IUDP ) मिळणा-या आर्थिक सहाय्याचा समावेश होतो, कर्जनिधी उभारला जातो. केन्द्र शासनाचे अर्थसहाय्य सदर एकात्म नागरी विकास कार्यक्रमाखालील ( IUDP ) योजनांकरिता त्यांच्या अनुमतीनेच वापरता येते. या योजनांकरता जमिनीची आवश्यकता असल्यामुळे जरी अशा अनेक योजना प्राधिकरणाने संमत केल्या असल्या तरी भूसंपादनाच्या अभावी त्यांची प्रगती होऊ शकली नाही.

व्यवहारिक निधीमध्ये, प्राधिकरण अधिनियमाच्या कलम १८(१)(अ) नुसार शासनाकडून दरवर्षी मिळावयाची (दरसाल रु.५ कोटी पेक्षा कमी नसलेली) रक्कम व फिरत्या निधीतून मिळणारे उत्पन्न यांचा समावेश होतो. महानगर प्रदेशात अधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याकरता ह्या राज्य शासनाच्या अनुदानाचा विनियोग करावयाचा आहे परंतु जिल्हा नियोजन व विकास परिषदांकडून मिळणा-या अल्प सहाय्यापुरतेच हे अनुदान आतापर्यन्त मर्यादित राहिले आहे. फिरत्या निधीतून मिळणारे उत्पन्न सध्या तरी उल्लेखनिय नाही.

प्रस्तावित निर्णयाच्या मसुद्याच्या संदर्भात कांही सदस्यांनी अशी सूचना केली की, स्थायी समितीला अर्थसंकल्पामध्ये ज्याची तरतूद केलेली नाही असा खर्च करण्याचे जे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत त्यावर मर्यादा घालणे (रु.१० लक्ष) आवश्यक आहे.

प्राधिकरणाने त्यानंतर पुढील ठराव संमत केला.

<u>ठराव क्रमांक १४६</u> :- असा ठराव करण्यात येत आहे की, महानगर प्राधिकरणाच्या अंदाजित जमा रकमा आणि वाटप केलेल्या रकमा दर्शवणारा १९७८-७९ या वित्तीय वर्षाच्या संबंधातील वार्षिक अर्थसंकल्प व १९७७-७८ चा सुधारित अर्थसंकल्प यांस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २३(१) अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, संमत झालेल्या अर्थसंकल्पात

ज्यासाठी......

ज्यासाठी तरतूद करण्यांत आलेली नाही अशा प्रत्येकी रु. १० लाख किंवा त्यापेक्षा कमी खर्चाच्या योजना, सर्व्हे इ. मंजूर करण्यासाठी, व त्याच मर्यादेतील अशा प्रकारचा खर्च करण्यासाठी, याव्दारे प्राधिकरणाकडून, स्थायी समितीला प्राधिकृत करण्यांत येत आहे. मात्र, ज्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केलेली नाही असा खर्च केल्याची प्रकरणे प्राधिकरणास त्याच्या पुढील बैठकामध्ये कळविण्यांत आली पाहिलेत.

आणखी असाही ठराव करण्यांत येत आहे की, ज्यांना पदे निर्माण करण्यांस मंजूरी देण्याचा अधिकार आहे, अशा सक्षम प्राधिका-यांना, अर्थसंकल्पाच्या आस्थापना अनुसूचीमध्ये ज्यांचा समावेश केलेला नाही, अशी पदे निर्माण करण्यासाठी अधिकार प्रदान करण्यांत येत आहे, परंतु, अशा पदांवरील खर्च, कर्मचारीवर्गाचे वेतन व भत्ते यासाठी अर्थसंकल्पामध्ये केलेल्या एकूण तरतुदींमधून भागवता आला पाहिजे.

विषय क्र. ४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९७६-७७ सालचा वार्षिक अहवाल

प्राधिकरणानें कार्यक्रम पत्रिकेवरील टिप्पणी विचारात घेतली व पुढील ठराव संमत केला :-

ठराव क्र. १४७ :- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९७६-७७ च्या वार्षिक अहवालाच्या मसुद्यास प्राधिकरणाने मान्यता दिली असून महानगर आयुक्तांना तो शासनास सादर करण्याचे अधिकार देण्यांत येत आहेत.

विषय क्र. ५ : १९७७-७८ च्या कार्यक्रमाचा प्रगती अहवाल

प्राधिकरणाने प्रगती अहवालाची नोंद घेतली.

विषय क्र. ६ : वांद्रे-कुर्ला संयुक्त क्षेत्रातील घाऊक व निमघाऊक कापड बाजाराची जागा.

महानगर आयुक्तांनी कार्यक्रम पत्रिकेच्या इंग्रजी टिपणीतील टंकलेखनाची चूक निदर्शनास आणली आणि परिच्छेद ५(३) मधील शेवटचे वाक्य पुढील प्रमाणे दुरुस्त केले. "या कामासाठी वाजवी किंमत घेऊन जमीन देण्यांत येईल. परंतु मग अर्थसहाय्यित तत्वावर कोणतीही जमीन उपलब्ध करुन देण्यांत येणार नाही."

प्राधिकरणाने कार्यक्रम पत्रिकेवरील टिप्पणी विचारांत घेतली. घाऊक व्यापा-यांनी खाली करावयाच्या सध्याच्या जागांचा कशाप्रकारे उपयोग करावा, सद्याच्या जागेवर असलेले घाऊक व निमघाऊक व्यवसाय संपूर्ण बंद करण्यासाठी परिणामकारक उपायांची योजना, व वांद्रा-कुर्ला संकुलामध्ये माथाडी कामगारांना निवासी जागा देणे, याबद्दल सूचना करण्यांत आल्या. हाप्रकल्प सविस्तर तयार करतांना या सर्व सूचना लक्षांत घेण्यांत येतील असे महानगर आयुक्तांनी सांगितले. असा सविस्तर प्रकल्प तयार झाल्यावर तो प्राधिकरणासमोर मान्यतेकरता ठेवण्यात येईल. त्यानंतर प्राधिकरणानें पुढील ठराव संमत केला.

ठराव क्र. १४८ :- असा ठराव करणीत येतो की, कार्यक्रम पत्रिकेवरील टिप्पणीत समाविष्ठ केलेल्या ढोबळ योजनेच्या रुपरेषेचा विचार करुन प्राधिकरणाने ती तत्वतः संमत केली आणि कार्यक्रम पत्रिकेवरील टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांस महानगर आयुक्तांना प्राधिकृत केले.

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, १९७८ रोजी भरलेल्या बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची सूची

| | |
|---|---|
| श्री. वसंतदादा पाटील, मुख्यमंत्री(व नगरविकास मंत्री) | अध्यक्ष |
| श्री. मुरली एस्. देवरा, मुंबईचे महापौर | उपाध्यक्ष |
| श्री. एस्. व्ही. भावे, शासनाचे मुख्य सचिव | सदस्य |
| श्री. एस्. डी. बसवंत, विधानपरिषद सदस्य, शहापूर | " |
| श्री. हंसराज गुप्ता, महानगरपालिका सदस्य, मुंबई | " |
| श्री. सी.एम्. कोरिया, अध्यक्ष, गृहनिर्माण नागरी नवीनिकरण व पर्यावरण मंडळ, बी.एम्.आर्.डी.ए. | " |
| श्री. बी. जी. देशमुख, महानगरपालिका आयुक्त, मुंबई | " |
| श्री. बी. एस्. ढवळे, अध्यक्ष, सिडको. | " |
| श्री. सुधीर जोशी, महानगर पालिका सदस्य, मुंबई | " |
| श्री. सोहनसिंग कोहली, महानगर पालिका सदस्य, मुंबई | " |
| श्री. एम्. के. झांडवानी, महानगर पालिका सदस्य | " |
| श्री. डी. के. खानविलकर, अध्यक्ष, अलिबाग नगरपालिका | " |
| श्री. पुष्पकांत म्हात्रे, महानगरपालिका सदस्य, मुंबई | " |
| श्री. मीर नसरुल्ला, केंद्र शासनाच्या बांधकाम व गृहनिर्माण मंत्रालयाचे सहसचिव | " |
| श्री. डी. एस्. जलावडे, अध्यक्ष, स्थायी समिती, बी.एम्.सी. | " |
| डॉ. एम्.जी.पाळेकर, अध्यक्ष, वसई नगरपालिका | " |
| श्री. एस्. डब्ल्यु.पटवारी, अध्यक्ष, डोंबिवली नगरपालिका | " |
| श्री. वसंत के. पाटील, अध्यक्ष, पंचायत समिती, भिवंडी | " |
| श्री. डी.बी. उर्फ तात्या सुळे, विधानपरिषद सदस्य, मुंबई | " |
| श्रीमती आशालता तोरस्कर, अध्यक्ष, सुधार समिती, बी.एम्.सी. | " |
| श्री. एच्.एम्.बंगारे, अध्यक्ष, जिल्हा परिषद, कुलाबा | " |
| श्री. पी. व्ही. नायक, महानगर आयुक्त, बी.एम्.आर्.डी.ए. | सदस्य-सचिव |

निमंत्रित -

सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

पवार/-
५.४.

(293)

No. BMRDA/MTG/15

Bombay Metropolitan Region
Development Authority,
18th floor, New Administrative
Building, Madame Cama Road,
Opp. Mantralaya,
B o m b a y - 400 032.

Date : 7th April, 1978.

The Minutes of the 15th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 31st March, 1978, are enclosed.

Sule

Secretary
Executive Committee.

To
All Members & Permanent invitees.
The Officers of the BMRDA.

MINUTES OF THE

FIFTEENTH MEETING OF THE BMRDA

Date : 31st March, 1978.

Place. : The Corporation Hall of
the Bombay Municipal
Corporation, Bombay.

The list of members and invitees present is attached (Annexure).

2. The Mayor welcomed the Chief Minister (and Minister for Urban Development) who, as Chairman of the Authority, presided over the meeting. The Chairman then placed on record the Authority's appreciation of the services rendered by the former Chairman, Shri Ratnappa Kumbhar, and former Vice-Chairman, Dr. (Smt.) Sushila Balraj, and also of the services rendered by Sarvashri V.R. Hoshing, H.G. Vartak, S.K. Wankhede, V.K. Tembe, S.S. Dighe, Nakul Patil, R.D. Bhandare, A.T. Patil and Smt. Kamala Raman, as members of the Authority.

3. The items of the Agenda were then taken up for consideration.

Item No. 1 : Confirmation of the minutes of the Thirteenth and Fourteenth meetings.

The minutes were confirmed.

Item No. 2 : Action taken on the minutes of the Thirteenth and Fourteenth meetings.

Action taken was noted.

Shri Baswant referred to the minutes of the thirteenth meeting of the Authority, relating to Item No. 3 (Draft Development Plan for New Bombay), and inquired about the progress of action in regard to (1) provision for development and expansion of existing gaothans in New Bombay; and (2) rehabilitation of local persons affected by the acquisition of the land for the Development Plan. The Managing Director, CIDCO, explained that the proposal for acquisition of land under the Land Acquisition Act in preference to the Urban Land Ceiling Act for expansion of gaothans had been submitted to the State Government; so also, the scheme for the allotment of plots in gaothans, after consultation with the Gram Panchayats, was submitted to Government, and that further action would be taken as soon as Government's sanction was received. The Chairman directed that action in this

regard....

regard should be expedited. As regards rehabilitation of the persons affected by the acquisition of land, the Chairman directed that early action should be taken to allow the persons concerned to cultivate the land not required for development and to construct their farm houses, where permissible.

Item No. 3 : Annual Budget Estimates for 1978-79.

The Authority considered the Agenda Note. During the discussion, some of the members expressed a concern about inadequate provision for development of the region outside Greater Bombay and the failure of the Authority to mobilise financial assistance from outside sources, particularly the Government of India.

The Metropolitan Commissioner pointed out that the budget had only translated into monetary terms the Work Programme for 1978-79, which had been approved by the Authority in its meeting held on the 8th December, 1977. He also pointed out that the main difficulty in mobilising assistance from the Government of India for schemes outside Greater Bombay and New Bombay is the lack of support in the shape of matching contribution, which is an essential feature of the Government of India's Integrated Urban Development Programme (IUDP). He also explained the constraints implicit in the financial structure of the BMRDA for executing works of an infrastructural nature, which is the pressing need of the areas outside Greater Bombay. The fund structure of the Authority consists of (i) Revolving Fund; (ii) Loans Fund; and (iii) the Residual or the Operations Fund. By its very nature, the Revolving Fund has necessarily to be applied to schemes, which are capable of returning the investment within a reasonable period. This Fund could not, therefore, be spent on studies and surveys or on infrastructural works, which are not capable of returning the investment within a reasonable period. As and when land becomes available, area development works and connected schemes are being executed with the help of the Revolving Fund. The Loans Fund consists of funds borrowed under Section 18A of the BMRDA Act, including Central assistance received under the Integrated Urban Development Programme (IUDP). The Central loan assistance has to be utilised with the approval of the Government of India for schemes under

the IUDP. Since these schemes are also land-based, the utilisation of the loan assistance is awaiting land acquisition for a number of schemes/already approved by the Authority. The Operations Fund consists of the annual contribution of not less than Rs.5 crores to be made by the State Government under Section 18(1)(a) of the BMRDA Act and income generated by the Revolving Fund. It is this State Government's contribution, which could be utilised for improving the infrastructural facilities in the region, but the State Government contribution has so far been limited to small allocations made by the DPDCs. The income from the Revolving Fund is not significant at present.

With regard to the draft Resolution, some members felt that there should be a ceiling limit (Rs.10 lakhs) on the delegation of power to the Standing Committee for incurring expenditure not provided for in the budget.

The Authority thereafter passed the following Resolution :-

RESOLUTION 146 : Resolved that the annual budget estimates in respect of the financial year 1978-79 and the revised estimates for 1977-78, showing estimated receipts and disbursements of the Metropolitan Authority, are approved under Section 23(1) of the BMRDA Act, 1974.

Resolved further that the Authority do and hereby delegate the power to the Standing Committee to sanction schemes, surveys, etc. estimated to cost not more than Rs.10 lakhs in each case, and to authorise the incurring of any expenditure not exceeding the same limit, in respect of which provision has not been made in the approved budget, subject to a report of such cases being made to the Authority at the next meeting.

Resolved further that the authorities competent to sanction the creation of posts are authorised to create posts, which are not included in the establishment schedule to the budget; provided that the expenditure on such posts can be met from the total provision for salaries and allowances of the staff made in the budget.

Item No. 4 : Annual Report of the BMRDA for 1976-77.

The Authority considered the Agenda Note, and passed the following Resolution :-

RESOLUTION 147 : ....

RESOLUTION 147 : Resolved that the Authority do approve the draft of the Annual Report of the BMRDA for 1976-77, and authorise the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government.

Item No. 5 : Annual Work Programme for 1977-78.
Progress report -

The Authority noted the Progress Report.

Item No. 6 : Location of wholesale and semi-wholesale cloth market in the Bandra-Kurla Complex.

The Metropolitan Commissioner pointed out a typographical error in the English version of the Agenda note, and corrected the last sentence in para 5 (iii) to read : "Land will be given for the purpose at an appropriate price, but there will be no question of providing any land on subsidized basis".

The Authority considered the Agenda Note. Several suggestions were made in regard to the manner of utilisation of the existing premises to be vacated by the wholesale merchants, the need for effective measures to terminate the wholesale or semi-wholesale business at the present location and housing of Mathadis in the Bandra-Kurla Complex. The Metropolitan Commissioner stated that these suggestions would be borne in mind while working out the details of the project. The detailed project would be prepared and placed before the Authority for approval. The Authority then passed the following Resolution :-

RESOLUTION 148 : Resolved that the Authority, having considered the broad scheme outlined in the Agenda Note, approves in principle the general approach to the scheme, and authorises the Metropolitan Commissioner to initiate further action on the lines indicated in the Agenda Note.

*****

tms/4.4.78

ANNEXURE

List of members present at the 15th meeting of the Authority held on the 31st March, 1978.

| | |
|---|---|
| Shri Vasantdada Patil,<br>Chief Minister (U.D.). | Chairman. |
| Shri Murli S. Deora,<br>Mayor of Bombay. | Vice-Chairman. |
| Shri S. V. Bhave,<br>Chief Secretary to Government. | Member. |
| Shri S.D. Baswant,<br>M.L.C., Shahapur. | " |
| Shri Hansraj Bhugra,<br>Councillor, BMC. | " |
| Shri C.M. Correa,<br>Chairman, HURE Board. | " |
| Shri B.G. Deshmukh,<br>Municipal Commissioner, BMC. | " |
| Shri B.S. Dhavle,<br>Chairman, CIDCO. | " |
| Shri Sudhir Joshi,<br>Councillor, BMC. | " |
| Shri S.J. Kohli,<br>Councillor, BMC. | " |
| Shri M.A. Khandwani,<br>Councillor, BMC. | " |
| Shri D.K. Khanvilkar,<br>President, Alibag<br>Municipal Council. | " |
| Shri Pushpakant Mhatre,<br>Councillor, BMC. | " |
| Shri Mir Nasrullah,<br>Joint Secretary, Govt.of<br>India, Ministry of Works<br>and Housing. | " |
| Shri D.S. Nalavde,<br>Chairman, Standing<br>Committee, BMC. | " |
| Dr. M.G. Parulekar,<br>President, Vassai<br>Municipal Council. | " |
| Shri S.W. Patwari,<br>President, Dombivli<br>Municipal Council. | " |

(P.T.O.)

| | |
|---|---|
| Shri Vasant K. Patil, Chairman, Panchayat Samiti, Bhivandi. | Member. |
| Shri D.B. Sule, MLC, Bombay. | " |
| Smt. Ashalata Toraskar, Chairman, Improvements Committee, BMC. | " |
| Shri H.M. Wangare, President, Zilla Parishad, Kulaba. | " |
| Shri P.V. Nayak, Metropolitan Commissioner, BMRDA. | Member-Secy. |

INVITEES

Secretary to Government of Maharashtra, Urban Development.

Chief Executive Officer, MIDC.

*****

tms/1.4.78